# तुझे गीत लिहण्यासाठी, .....

(चाल- तुझे गीत गाण्यासाठी.. )

तुझे रूप स्वप्नी माझ्या, रोज येऊ दे
तुझे गीत लिहण्यासाठी, स्फूर्ती येऊ दे

तुझा फोटो हाती येता, मन जे धुंद होते
कल्पनांची साथ मिळता, शरीर बधिर होते
भास तव मिठीचा मजला, क्षणिक होऊ दे
तुझे गीत लिहण्यासाठी.....................

तूच कुशल गजगामिनी, नृत्यचतूर अभिनेत्री
नाही तुझ्यासम ह्या जगती, रुपवती कोणी
भुरळ तुझी माझ्यावरती, अशीच राहू दे
तुझे गीत लिहण्यासाठी.....................

*कवी 'अनामिक'*